31 MAY 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पाणीसाठ्यात एक कोटी लिटरची भर पडणार

## विद्यापीठाची जलस्वयंपूर्णता वाढणार; गाळ काढला, कॅम्पसमधील तलावांच्या क्षमतेचा विस्तार

■ संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३० : पाण्याबाबतची स्वयंपूर्णता वाढविण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने सध्या काही ठोस पावले टाकली आहेत. त्यात कॅम्पसमधील तीन तळ्यांमधील गाळ काढून त्यांची पावसाचे पाणी साठवण करण्याची क्षमता वाढविली आहे. त्याने या परिसरातील पाणीसाठा एक कोटी लिटरने वाढणार आहे.

विद्यापीठाने गेल्या काही वर्षांत राबविलेल्या जलव्यवस्थापन अभियानामुळे विद्यापीठ कॅम्पस पाणी वापराच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला आहे. दर मोसमात विद्यापीठ साधारणतः ३३ कोटी लिटर पाण्याचे संवर्धन करते. त्यासह रोज ४ लाख लिटर सांडपाण्यावर पुनर्प्रक्रिया करून ते उद्यानांसाठी वापरले जाते. विद्यापीठातील शंभर फुटी विहिरी शेजारील शेततळे, वि. स. खांडेकर भाषाभवनमागील आणि संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागा शेजारील तलावाच्या माध्यमातून पावसाचे पाणी साठवले जाते. कॅम्पसवरील विद्यार्थी संख्या वाढल्याने साहजिकच पाण्याचा वापरही वाढत आहे. अशा स्थितीत पाणीसाठाही वाढविणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने विद्यापीठ प्रशासनाने या तीन तळ्यांमधील गाळ काढून त्यांची पावसाचे पाणी धारण करण्याची क्षमता वाढविण्याचे काम मे महिन्याच्या प्रारंभी




सुरू केले. त्यातील शेततळे आणि संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या परिसरातील तलावाचे काम झाले असून, वि. स. खांडेकर भाषाभवन परिसरातील तलावाजवळील रस्त्याचा मुरुम काढण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. या तलावांची क्षमता वाढल्याने विद्यापीठाच्या पाणी साठ्यात

> विद्यापीठ पाण्याबाबत स्वयंपूर्ण झाले आहे. पावसाळ्यात विद्यापीठातील सध्याचे पाणीसाठे ओव्हर फ्लो होतात. ते टाळण्यासह पाणीसाठा वाढविण्यासाठी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाने काही उपक्रम, संकल्पना राबविल्या आहेत. त्याने पाणी साठवण क्षमता निश्चितपणे वाढणार आहे. दरवर्षी किमान पाच ते दहा टक्क्यांनी पाणीसाठा वाढविण्याचे ध्येय आहे. साठवलेले पाणी आणि त्याच्या पुनर्वापराबाबत विद्यापीठ सजग आहे.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू

यंदा आणखी एक कोटी लिटरची भर पडणार आहे.

### 'बायो प्युरिफायर'ने घटविले पाण्याचे प्रदूषण

मोरेवाडीच्या हद्दीतून विद्यापीठ कॅम्पसमधून पुढे पंचगंगा नदीत जाणाऱ्या ओढ्याचे पाणी प्रदूषित झाले आहे. या पाण्याच्या प्रदूषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विद्यापीठाने किर्लोस्कर उद्योग समूहाच्या मदतीने बायो प्युरिफायरची संकल्पना राबविली आहे. त्यामध्ये कर्दळ, रानकेळी, अळू आदी कंदवर्गीय वनस्पतींचा वापर केला आहे. फेब्रुवारीपासून बायो प्युरिफायरचा वापर केला. त्याचे चांगले परिणाम दिसले आहेत. त्यामुळे विद्यापीठ कॅम्पसमधून पुढे जाणाऱ्या या ओढ्यातील पाण्याचे प्रदूषण कमी झाले आहे. पंचगंगा नदी प्रदूषणमुक्तीला या माध्यमातून विद्यापीठ हातभार लावत असल्याचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सांगितले.



कोल्हापूर : मोरेवाडीच्या हद्दीतून शिवाजी विद्यापीठ कॅम्पसमधून पुढे पंचगंगा नदीत जाणाऱ्या ओढ्यातील पाण्याचे प्रदूषण कमी करण्यासाठी बायो प्युरिफायरची संकल्पना राबविली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 1 MAY 2024
सकाळ

# दूरशिक्षण केंद्राची पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया सुरू

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे २०२४-२५ मधील एम. ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास), एम. कॉम, एम. एस्सी (गणित) अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेस सुरुवात झाली असून, अर्ज करण्याची अंतिम मुदत ३० जूनपर्यंत आहे, अशी माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली.

जे विद्यार्थी अजूनही शिक्षणापासून वंचित आहेत, ज्यांचे शिक्षण अपूर्ण आहे, तसेच शासकीय व निमशासकीय अथवा खासगी कर्मचारी, सेवक अशा इच्छुकांनी दूरशिक्षण आणि ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या एकूण ८६ अभ्यास केंद्रात प्रवेशाची संधी मिळणार आहे. विद्यार्थी, गृहिणी, कामगार, सैनिक, उद्योजक, शेतकरी, सरकारी कर्मचारी, खासगी कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी प्रवेश घ्यावा. विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर 'डिस्टन्स एज्युकेशन' लिंकवर प्रवेशाबाबतची जाहिरात उपलब्ध आहे.

## दूरशिक्षण विभागाची वैशिष्ट्ये

- दुहेरी पदवीची सोय
- १२ प्रोग्राम अंतर्गत विविध कोर्सेस
- दुर्गम भागासह ८६ अभ्यासकेंद्रांची सोय
- नेट/सेट तसेच इतर स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन
- नोकरीविषयक, एमपीएससी व यूपीएससी मार्गदर्शन
- शैक्षणिक आणि करिअर विकासाच्या संधी
- ४०० पेक्षा जास्त दर्जेदार स्वयंअध्ययन साहित्य
- अभ्यास केंद्रात संपर्क सत्राचे आयोजन

दरम्यान, जे विद्यार्थी नियमित महाविद्यालयात प्रवेशित झालेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना दुहेरी पदवीचा लाभ मिळणार आहे. अधिक माहितीसाठी विद्यापीठातील मुख्य कार्यालयाशी अथवा नजीकच्या महाविद्यालयातील अभ्यास केंद्राशी संपर्क साधावा.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 1 MAY 2024
तरुण भारत

# अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन केंद्रास प्रारंभ

प्रतिनिधी
कोल्हापूर

२०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी अभियांत्रिकी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमात प्रवेश घेऊ उचिणाऱ्या विद्यार्थी तंत्रज्ञान अधिविभागांमध्ये प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन केंद्रात प्रारंभ करण्यात आला आहे. या केंद्रामध्ये विद्यार्थी व पालक यांना वैयक्तिक मार्गदर्शन केले जात आहे. त्यामध्ये अभियांत्रिकी म्हणजे काय विषय व स्थान निश्चित कसे करायचे. याविषयी मार्गदर्शन केले जाणार आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार होणारे बदल,

रोजगार संधी, शिक्षणाच्या संधी, विविध स्कॉलरशिप विद्यापीठाच्या विविध योजना, सीमाभागातील विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधा याविषयी मार्गदर्शन केले जाते. तसेच लागणारी कागदपत्रे व प्रवेश प्रक्रियेची माहिती देऊन शंकांचे निरान केले जाते. या केंद्रातील तज्ज्ञ प्राध्यापक यांना भेटून विद्यार्थी , पालकांनी माहिती घ्यावी, असे आवाहन केले आहे. तंत्रज्ञान अधिविभागामध्ये अभियांत्रिकी क्षेत्रामधील कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजीनियरिंग, फूड टेक्नॉलॉजी, केमिकल इंजिनीरिंग, सिव्हिल इंजिनीरिंग आणि मेकॅनिकल इंजिनीरिंग आदी अभ्यासक्रमाचा समावेश आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी, फूड टेक्नॉलॉजी, एनर्जी टेक्नॉलॉजी, एनव्हायरमेंटल सायन्स अंड टेक्नॉलॉजी या शाखांचा समावेश आहे. सर्वांनी प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन केंद्राचा लाभ घ्यावा असे आवाहन तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. एस.एन. सपली यांनी केले आहे.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 MAY 2024
लोकमत

# प्रवेश मार्गदर्शन केंद्र

कोल्हापूर : अभियांत्रिकी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी व पालकांच्या सुविधेसाठी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागांमध्ये प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन केंद्रास प्रारंभ करण्यात आला. या केंद्रामध्ये विद्यार्थी व पालक यांना वैयक्तिक मार्गदर्शन केले जात आहे. विद्यार्थी व पालकांना त्यांना प्रत्यक्ष भेटून माहिती घेण्याची संधी प्राप्त झाली आहे. अनेक विद्यार्थी व पालक या केंद्रास भेट देत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 MAY 2024
लोकमत

# विद्यापीठात नाट्य कार्यशाळेला प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे बुधवारपासून नाट्य कार्यशाळेला सुरुवात झाली. आज, शुक्रवारपर्यंत सकाळी १०:३० ते दुपारी २ वाजेपर्यंत ही कार्यशाळा असेल. या कार्यशाळेचे उद्‌घाटन संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्र. विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांच्या हस्ते झाले.

यावेळी डॉ. संजय तोडकर, रविदर्शन कुलकर्णी, डॉ. राजश्री खटावकर, राज पाटील, युवराज केळुसकर, विकास कांबळे हे नाट्य प्रशिक्षक उपस्थित होते. कार्यशाळेमध्ये अभिनय म्हणजे काय? दिग्दर्शनाची कार्यपद्धत, नाट्यलेखन विचार, रंगमंच तंत्राची ओळख अशा विषयांवर या तज्ज्ञ शिक्षक-नाट्यकर्मींचे मार्गदर्शन मिळणार आहे. राजापूर, मालवण, गडहिंग्लज, सांगली, कऱ्हाड, कोल्हापूर अशा विविध ठिकाणाहून विद्यार्थी या कार्यशाळेत सहभागी झाले आहेत.

जनसंपर्क कक्ष,
31 MAY 2024 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातर्फे ६१२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील आजअखेर ६१२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. विद्यापीठाच्या वतीने पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. गुरुवारी मास्टर ऑफ अॅग्रीकल्चर, मास्टर ऑफ बिझनेस अॅडमिनिस्ट्रेशन आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. ५५ विद्यार्थ्यांपैकी ७ विद्यार्थी परीक्षेला अनुपस्थित होते. दि. ३० रोजी एमएस्सी (अॅनालिटीकल केमेस्ट्री), एमएस्सी (ऑर्गेनिक केमेस्ट्री), बॅचलर ऑफ डिझाईन, एमए (इंग्रजी) आदी अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 MAY 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या ६१२ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ६१२ परीक्षांचे निकाल गुरुवारअखेर जाहीर करण्यात आले. गुरुवारी ३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या, तर १६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. निकालाची सरासरी ९.३६ इतकी आहे.

31 MAY 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# करिअर विशेष...

(जाहिरात पुरस्कृत)

# रसायनशास्त्रातील करिअरच्या विविध संधी



**अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, ऊर्जा, हवा, पाणी आणि माती या आपल्या मानवाच्या मूलभूत दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी रसायनशास्त्राची भूमिका महत्त्वाची आहे.**

रसायनशास्त्र ही एक वैज्ञानिक शाखा आहे जी घटक व संयुगे, त्यांचे परिवर्तन तसेच या प्रक्रियेदरम्यान शोषली जाणारी अथवा सोडलेली जाणारी ऊर्जा यांच्याशी संबंधित आहे.

रसायनशास्त्र विषयात विविध क्षेत्रांत असणाऱ्या नोकरीच्या अमर्याद संधी यामुळे बीएस्सी केमिस्ट्री विषयास विद्यार्थी संख्या ही इतर विषयांपेक्षा जास्त असते ही वस्तुस्थिती आहे. रसायन-शास्त्रात करिअर करायचे असल्यास अकरावी, बारावीमध्ये विज्ञान शाखेत प्रवेश घेणे अत्यंत गरजेचे आहे. जर रसायनशास्त्र या विषयांची आवड असल्यास ग्रॅज्युएशनमध्ये निवड ही आपल्याला पुढे कोणत्या क्षेत्रात जायचे आहे याचा विचार करून ठरवावी.

याचप्रमाणे ज्यांना मेडिकल क्षेत्रात जायचे जर नसेल; परंतु मेडिकल क्षेत्राशी निगडित काही करिअर करायची आवड असेल तर त्यांच्यासाठी फार्मा क्षेत्रात करिअरच्या विविध संधी खुल्या होतात. तसेच १२ वी उत्तीर्ण झाल्यानंतर रसायनशास्त्राची व इंजिनिअरिंगची एकत्रितरीत्या आवड असेल तर केमिकल इंजिनिअरिंग हा एक चांगला पर्याय उपलब्ध आहे. फार्मसीमध्ये केवळ D.Pharm, B.Pharm, M.Pharm एवढच नाही तर B.Pharm-नंतर MBA करून थोडा वेगळा असा एक पर्याय फार्मा इंडस्ट्रीमध्ये जाण्यासाठी उपलब्ध आहे. याखेरीज १२ वी उत्तीर्ण झाल्यानंतर ज्यांना चिकित्सा करण्यामध्ये व इतर क्षेत्राची आवड असेल तर त्यांनी Forensic Science चा देखील विचार करण्यास हरकत नाही. यामध्ये महाराष्ट्र राज्य शासनाच्या अधिपत्याखालील संस्थांमध्ये सुरुवात अगदी डिप्लोमापासून विविध पर्याय उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे ज्यांना विधि म्हणजे लॉ शाखेत आवड असेल तर त्यांनी केमिस्ट्री विषयात पदवी प्राप्त केल्यानंतर नंतर ३ वर्षांचा लॉदेखील करू शकतात.

१२वी उत्तीर्ण झाल्यानंतर एक, तर पदवीला रसायनशास्त्र विषय घेऊन अथवा Chemical Engineering, Pharma, Forensic सायन्सद्वारे आपणास रसायनशास्त्रात येता येईल.

आता आपण Graduation नंतर Post-Graduation ला जाण्यासाठी द्याव्या लागणाऱ्या विविध प्रवेश परीक्षांविषयावर थोडा प्रकाश टाकू.

B.Sc रसायनशास्त्रमध्ये पदवी उत्तीर्ण झाल्यानंतर तुम्हाला विविध स्पर्धा परीक्षादेखील देता येतात. आय. आय. टी.ला जाण्यासाठी ची JAM ही परीक्षा त्याचप्रमाणे आताची ICT पूर्वी त्याला UDCT-नावाने ओळखले जात असे. याचीही वेगळी प्रवेश परीक्षा देता येते. मुंबई विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, सावित्रीबाई फुले विद्यापीठ व इतर विद्यापीठ, Tata Institute of Fundamental Research (TIFR) व NMIMS यामधे ज्यांना जायचे आहे त्यांनी या परीक्षांची तयारी करावी. दिल्ली, कर्नाटक, राजस्थान, गुजरात, प. बंगाल, तामिळनाडूतील विद्यापीठांच्या CET प्रवेश परीक्षा देण्याचा पर्याय उपलब्ध आहे.

- प्रा. डॉ. राहुल माने, सहायक प्राध्यापक, रसायनशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 MAY 2024
तरुण भारत

## प्रा. यमगेकर यांना विद्यापीठाचा कलर अवॉर्ड

काळे : येथील विठ्ठलराव पाटील महाविद्यालयातील प्राध्यापक विक्रम यमगेकर यांना शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कलर अवॉर्ड देऊन गौरविण्यात आले . कर्नाटक या ठिकाणी झालेल्या आंतर विद्यापीठ स्पर्धेत बॉडी बिल्डिंग संघाचे संघ व्यवस्थापक व कोच म्हणून शिवाजी विद्यापीठाला दोन सुवर्णपदके मिळवून देण्यामध्ये प्राध्यापक यमगेकर यांनी मोलाचा वाटा उचलल्याबद्दल कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ.व्ही.एन. शिंदे शिंदे, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. शरद बनसोडे व डॉ. गायकवाड यांच्या हस्ते त्यांना गौरविण्यात आले.

या यशामध्ये यमगेकर यांना प्राचार्य डॉ. कमलाकर राक्षेसे, संस्था अध्यक्ष विठ्ठलराव पाटील ,संस्था उपाध्यक्ष राहुल पाटील व सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांचे प्रोत्साहन लाभले.